**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८**
शासन वि. रफिक इनामदार.
नि.क्र.८५

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४</u>**

**आरोपी क्रं.३ विरुध्द फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे त्याच्या अनुपस्थीतीत,**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

**नाव : मनोहर भास्करराव शिंदे,**
वय : ५७ वर्षे, व्यवसाय: शेती,
रा. लक्ष्मीनगर, मलकापूर, ता.कराड, जि. सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एन.एस. अहिवळे यांचे मार्फत–</u>**

सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये मी मलकापूर येथे सरपंच पदावर काम केले आहे. त्यावेळी, मलकापूर ग्रामपंचायत येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून एस.बी.निकम व वरिष्ठ सहाय्यक म्हणून ज्ञानदेव साळुंखे हे कार्यरत होते. संबंधित ग्रामपंचायतीचे शिक्के हे ग्रामविकास अधिकारी व लिपीक पांडुरंग बोरगे यांच्या ताब्यात होते. एखाद्या व्यक्तिने ग्रामपंचायतीकडे उतारा मागणी केल्यास संबंधित ग्रामपंचायतीचे लिपीक म्हणजे संगणक ऑपरेटर, तो उतारा तयार करतात व त्यावर ग्रामविकास अधिकारी शिक्का मारुन सही करतात. त्या उताऱ्यावर ग्रामपंचायतीचा गोल शिक्का, ग्रामविकास अधिकारी यांचा पदनाम दर्शक शिक्का व संगणक ऑपरेटर यांचा शिक्का असतो. मी आरोपी क्र.२ यास ओळखतो. तो मलकापूर येथील रहिवासी असून प्रस्तुत प्रकरणातील आरोपी आहे. आरोपी क्र.१ व २ आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र.२ याने संबंधित ग्रामपंचायतीकडे कराड मर्चंट पतसंस्था यांचा रक्कम रु.०१,६०,०००/– चा बोजा कमी करुन बाबाजी पाटील पतसंस्था यांचा रक्कम रु.१०,००,०००/– चा बोजा नोंद करुन उतारा घेतला होता. त्यानंतर राजेंद्र सुरी पतसंस्थेचा त्यांचा रक्कम रु.१०,००,०००/– चा कर्जाचा बोजा नोंद असलेला उतारा मागणी अर्ज आमच्या ग्रामपंचायतीकडे प्राप्त झाला होता. संबंधित राजेंद्र सुरी पतसंस्थेकडून प्राप्त अर्जासोबत गहाणखत छायांकित प्रत व ग्रामपंचायतीचा ८अ उतारा छायांकित प्रत सादर केले होते. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी व लिपीक यांनी अभिलेख पाहिला असता त्यामध्ये विवादित बोजा दिसून आला नाही. त्यावेळी, विवादित उताऱ्याची तपासणी केली असता त्यावरील अक्षर व संबंधित ग्रामपंचायतीकडून जारी करण्यात

येणाऱ्या उताऱ्यांवरील अक्षर फॉंट भिन्न असल्याचे दिसून आले. तसेच, विवादित उताऱ्यावरील ग्रामविकास अधिकारी व संगणक ऑपरेटर यांचे उमटविलेले शिक्के व सह्या देखील भिन्न असल्याचे दिसून आले. त्यावरुन तो उतारा बनावट असल्याचे दिसून आले. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायतीची बैठक घेवून त्या संदर्भात चर्चा केली. तसेच, संबंधित ग्रामपंचायतीचे सल्लागार विधिज्ञ बहुलेकर यांचा सल्ला घेवून पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. त्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांनी मलकापूर ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड बनावट केल्याचे निदर्शनास आले व मी कराड शहर पोलिस ठाणे येथे खबर दिली. आता मला सहा. सरकारी अभियोक्ता यांनी दि.०८/१२/२००७ रोजीचा खबरी जबाब व त्यानुसार प्रथम खबर अहवाल दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्र.८६ व ८७</u>** देण्यात येतात. तपासादरम्यान पोलिसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला होता. सदर पुरवणी जबाब नोंदवितेवेळी मी पोलिसांना आरोपींनी बनावट उतारा तयार केल्याचे, तसेच बनावट शिक्के तयार केल्याचे, बनावट सह्या केल्याचे सांगितले होते. आम्ही ग्रामपंचायतीचे अस्सल शिक्के कराड येथील इगल स्टँप यांच्याकडून तयार केले होते. त्यामध्ये ग्रामपंचायतीचा गोल शिक्का, ग्रामविकास अधिकारी यांचा पदनाम शिक्का व संगणक ऑपरेटर यांच्या शिक्याचा समावेश होता.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ निकम यांच्यातर्फे सुरु</u> –**

०२. हे म्हणणे खरे आहे की, व्यक्तिने मागणी अर्ज ग्रामपंचायतीकडे सादर केल्यानंतर त्यास अभिलेखानुसार उतारा दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील आरोपींनी विवादित उतारा मागणी अर्ज व्यक्तिशः माझ्याकडे सादर केला नव्हता. सन २००७ साली मलकापूर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे कार्यरत होते अगर कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवादित खबर सरपंच या नात्याने दाखल केली आहे. सरतपासामध्ये कथन केल्याप्रमाणे विवादित बैठकीच्या वेळी मला ठराव करुन कथीत घटनेसंदर्भात खबर देण्यास अधिकृत केले नव्हते.

**प्रश्न** – प्रस्तुत प्रकरणी खबर दाखल करतेवेळी तुम्ही तुम्हाला अधिकृत करणारा ग्रामपंचायतीचा ठरावा पोलिस ठाण्यात दिला नव्हता ?

**उत्तर** – ठराव झाला नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीकडून जारी करण्यात येणाऱ्या ८अ उताऱ्यावर सरपंच म्हणून माझी सही अगर शिक्का नसतो. हे म्हणणे खरे नाही की,

कथीत घटनेसंदर्भात ग्रामपंचायतीचे सल्लागार विधिज्ञ बहुलेकर यांच्याकडून लेखी सल्ला प्राप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दि.०८/१२/२००७ रोजी खबर देते वेळी सल्लागार विधिज्ञ यांचा लेखी सल्ला संबंधित पोलिस यांच्याकडे दिला नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ याने दि.१४/११/२००६ रोजीचा कथीत अर्ज व्यक्तिशः माझ्याकडे दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, त्या संदर्भात मी व्यक्तीशः काही एक कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवादित दि.१४/११/२००६ रोजीचा मागणी अर्ज अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र सुरी पतसंस्था यांनी देखील विवादित अर्ज माझ्याकडे व्यक्तिशः सादर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे कथीत अर्जासोबत दाखल कागदपत्रे पाहण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व्यक्तिशः अभिलेख पाहण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवादित कथीत बनावट उतारा तसेच मूळ अभिलेखातील उतारा यांची पडताळणी मी व्यक्तिशः केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ ग्रामविकास अधिकारी व संगणक ऑपरेटर यांच्या सांगण्यावरुन कथीत बनावटीकरण झाल्याचे मी कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, विवादित उताऱ्याचे बनावटीकरण नक्की कोणी केले याबाबत मला व्यक्तिशः माहिती नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, दि.२०/०८/२००७ रोजी राजेंद्र सुरी पतसंस्थेकडून विवादित पत्र प्राप्त झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सल्लागार विधिज्ञ बहुलेकर यांचा सल्ला नेमका कोणत्या दिवशी प्राप्त केला, हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत कार्यवाही संदर्भात विधिज्ञ यांचा सल्ला आवश्यक असल्यास ग्रामपंचायतीच्या लेटर हेडवर विनंती पत्र पाठविले जाते. हे म्हणणे खरे आहे की, तत्सम पत्र प्रस्तुत प्रकरणी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, विधिज्ञ यांचा सल्ला प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायत सदस्यांची बैठक घेवून चर्चा केली जाते. प्रस्तुत प्रकरणी तशी चर्चा केली होती. कथीत बैठकीचे प्रोसिडींग अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सल्लागार विधिज्ञ यांचा लेखी सल्ला अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०/०८/२००७ ते दि.०८/१२/२००७ या सुमारे चार महिन्यांच्या कालावधीमध्ये विलंब झाला असून त्या संदर्भात बहुलेकर यांचा सल्ला घेतल्याबाबत खोटे कारण खबरमध्ये नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही विधिज्ञ यांचा सल्ला प्राप्त केला नाही. सन २००८ मध्ये मलकापूर

ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांची संख्या सुमारे ३०,००० होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे हस्ताक्षर अगर सही पाहण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ ग्रामविकास अधिकारी व इतर लोकांच्या सांगण्यावरुन वैयक्तिक माहिती नसताना खोटी खबर दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ हा आर्किटेक्चर डिप्लोमा केलेला व्यक्ति असून बांधकामाचे ठेके घेतो. आरोपी क्र.२ हा कोल्हापूर शहर परिसरामध्ये बहुतांश बांधकामाचे ठेके घेतो अगर कसे याबाबत मला माहिती नाही. आरोपी क्र.२ हा सन २००४ पासून बांधकाम व्यवसाया संदर्भात कोल्हापूर परिसरात राहण्यास आहे अगर कसे, याबाबत मला माहिती नाही.

०६. सन २००५ मध्ये मी कॉंग्रेस राजकीय पक्षातून निवडून आलो. हे म्हणणे खरे आहे की, मलकापूर ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये अशोकराव थोरात यांचे विरोधी गटाचे पॅनेल होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ हे विरोधी गटाचे कार्यकर्ते होते. हे म्हणणे खरे नाही की, केवळ विरुध्द राजकीय गटातील असल्यामुळे आरोपींविरुध्द खोटी खबर दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये आरोपींच्या हिताविरुध्द कथन केलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.03.28 16:28:07 +0530

दि. २८/०३/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०५)